
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
ग्रं. क्र. 2804
REFBK-0022708



"वाचे बरवे कवित्व कवित्वी रसिकत्व" – ज्ञानेश्वर

कवि मंडळ,

नासिक.

प्रणीत ——

प्रातिनिधिक कविता संग्रह

REFBK-0022708

पुष्प २ रे

# कवितरंग

प्रस्तावना—

प्रा. वि. मा. दि. पटवर्धन

* प्रकाशक

ग. म. अंधृटकर
ज्ञान वर्धिनी, तिवंधा
कवि मंडळ. नासिक.

* मुखपृष्ट सजावट

प्रेमचंद्र जोहरे

* मुद्रक

विजय त्र्यं. दाते
प्र वि न प्रिंटिग प्रेस,
१६०१, नगरकर लेन, नासिक–१.

* सर्व हक्क

कवि मंडळ, नासिक यांचे स्वाधीन

* पृष्ठ संख्या शेहेचाळीस

* प्रथमावृत्ती

मे १९७४

* किमत दोन रुपये पन्नास पैसे

# रसिकाची दाद

नासिकचं कवि मंडळ इतके दिवस माझ्या फारनं वाटेला गेलं नव्हतं त्यांच्या काव्य विषयक कामगिरीचं कौतुक मला वाटतं. त्यांचा पाहिला संग्रह "काफिला" मला आवडला होता. कविमनाची अशी आस्थेनं मशागत करणारी रविकिरण मंडळा सारखी एक संस्था नाशकास आहे याचाही मी अभिमान बाळगतो. पण हे सगळं दुरून. कारण काव्य हा माझा आवडीचा विषय असला तरी अभ्यासाचा नव्हे व्यासंगाचा तर नाहिच. ज्या वयांत आपली पत्नी ही "प्रिया" असते त्या वयांत टला–ट–जोडून कांही रचना केली असेल तेवढीच, एरव्ही मीहि माझ्या साहित्यिक उपद्व्यापांत काव्याच्या वाटेला गेलो नव्हतो.

अन् तरीहि कविमंडळाच्या "कवितरंग" या नव्या प्रकाशनासाठी कविमित्र अंधृटकरांच्या आग्रहास्तव मी प्रस्तावना लिहित आहे. चिवडेवाल्यानं रसगुल्ला वतविण्यासारखाच हा प्रकार. सुमारे पंचेचाळीस वर्षापूर्वी मी पाकक्रिया करुन पाहिली होती. कवीचं नांव बकुलराय, संग्रहाचं नांव चांदणी चौक, आणि माझ्या प्रस्तावनेचा मथळा आसराची वेस म्हणजे काव्यप्रांतांत दिल्ली पासून गल्ली पर्यंत केलेली मुशाफिरी सगळाच आनंद !

पण कविमंडळाच्या स्थापनेपासून कविमंडळाचे अनेक सदस्य मंडळाच्या प्रगतिसाठी खस्ता खाताहेत त्या माहित असल्यामुळेच या काव्य संग्रह संपादन मंडळाचे सदस्यांना नाही म्हणवेना "अहो हे काम एखाद्या कविवर्याना सांगा" असं मी त्यांना आर्जवून सांगितल, तेव्हा ते म्हणाले हे निवोदित कवी आहेत सगळे नासिक जिल्हृयातलेच, त्यांचं कौतुक आम्ही संग्रह प्रकाशित करुन करीत आहोत. त्याला तुमचा आशीर्वाद असावा.

खरं आहे आतां आशीर्वादापेक्षां अधिक मी देणार काय ?

ज्या कवींची या तरंगात हजेरी लागलीय त्यांचं प्रथम अभिनंदन करतो कारण त्यांच्या प्रतिभेच्या पहिल्या उन्मेषांना पुस्तक रूपानं प्रकाशित होण्याचं भाग्य लाभलय. कित्येकांना बरेच दिवस वाट पाहून शेवटी ते बंबात टाकून द्यावे लागतात. प्रदीर्घ निश्वासांसह !

रसिकांच्या हातीं आपली काव्यसुमनं देतांना कविमन किती कातर असतं. हे एक कवीच जाणे कै. तांबे सारख्या कविश्रेष्ठानं देखील अत्यंत हळूवार पणानं रसिकांना साद घातलीय–कुस्करु नका ही सुमने ! जरिवास, नसे तिळ यास, तरी तुम्हांस अर्पिली सु–मने ! राजकवि यशवंतांनी तर "हो मलिन विमल हा प्रभाव तुमच्या करा" अशी साखरपेरणी करुन शेवटी "कमलावरा" च्याच हाती आपली काव्य-पुष्पांजली सोपविलीय ! कवितरंगांतील कवींचं तरी रसिकांपाशी आणखी काय मागणं आहे ? ही आमची काव्यसुमनं हातांत घ्यावीत, त्यांत कांही सुगंध शोधावा, त्याचा आस्वाद घ्यावा आणि वा: ! एवढाच प्रसन्नतेचा उद्गार काढावा. नाहीच कांही हाती लागलं तर ही गोदावरीच्या प्रवाहांत अलगत सोडून द्यावी. पण पायदळी पडू देऊ नयेत.

कवितरंगांत रंगून गेलेले हे नासिकचे बरेच अनोळखी तरुण शारदोपासक शारदेच्या दरबारांत दबकत दबकत प्रवेश करताहेत आणि आपला नजराणा रसिकांच्या नजरेंत भरेल की नाही या आशंकेनं कुणाच्या तरी पायाशी ठेवून हळूच मागच्या रांगेत जाऊन बसताहेत. अंतराळात झेप घेणं, रसिक मनाला जाऊन भिडणं, ते मन ढवळून काढणं, अवकाशाच्या ओसाडीतील पडसाद मुके जे, ते बोलते करणं खपलेल्यांनी झांकलेल्या जखमा उघडया करणं– या सगळया "दूरदूरच्या वाटा"– आपल्या वामनी पावलांच्या टप्प्यांत येतील कां या प्रश्नाने अस्वस्थ झालेले कवी इथे आढळतात. हे असं कुठवर चाललणार आहे. या विचारानं वास्तवाकडे पाहून गलबलणारे चातक जसे आहेत तसे "आठवणी"चं मधुर गुंजन करणारे चंडोलही आहेत. "अर्ध्य" "धूण सांधतो आहे" यासारख्या स्वप्नरंजनाचंही येथे वावडं नाही.

हें बहुतेक शिल्प अवघड आहे प्रतिभेचे स्फुल्लिंग येथे आढळतात पण त्यांचा स्रोत तयार होऊन त्यानं अनुभव–सागराचा तळ अद्याप उजळलेला नाही. तेथून कांही संपदा वर काढायची आणि त्यानं आपल्या शिल्पाची सजावट करायची ही प्रकिया या मंडळींना अद्याप साध्य करुन घ्यायची आहे. सागराचा तळ गांठण्या इतकच मानवी मनाचे पापुद्रे उलगडणं हे फार कठीण काम. त्याला बुद्धी विशेष तरल आणि संवेदना फार सूक्ष्म लागते. बीज, स्वरुप आणि तंत्र ही प्रतिभासाधनांची अंग अभ्यासावी लागतात. इथं आहेत हे तरंग. लहर आली का उगवणारे नि ती संपली की मावळणारे पण तरीही रसिक-मनाला सुखवणारे, दुखवणारे, काही कासावीस करणारे देखील प्रतिभेचा हा अंकुर जोपासला तर फोफावेल असा भरपूर दिलासा देणारे.

"कविते देवीस" "शद्ब लावण्य" "कळते पण" "प्रतिक्षा" "थंडी जेव्हा मी म्हणते" "चिमणा हट्ट" या तरंगाकडे वाचकाचं लक्ष यादृष्टीन मी वेध्रू इच्छितो

नवागतांची ही कविता छापून आल्यामुळे जस तिचं स्वागत होईल तशी तिच्यावर टिकाही होईल. कवी मित्रांनी तिच्याकडेच अधिक लक्ष द्यावं. म्हणजे पुढील प्रगतीची दिशा ठरवितां येईल काव्यांत कल्पनाविलास हा "गमभन" समजावा, जाणिवा, नेणिवा, अभिव्यक्ति, रसोत्कर्ष अनुभवाची परिमाणं, इत्यादि अंतरंगाचे रंग, आणि जाति, वृत्त, छंद, मात्रा इ. बाह्यांगाचे घटक आपल्या चांगल्या परिचयाचे असायला पाहिजेत. सरावाचे नसले तरी हरकत नाहीं.

आज समाजांत मानवी जीवनांतील शाश्वत मुल्यांचा सर्वत्र वणवा पेटलेला दिसतो. माणूस कुठं चाललाय तेच कळत नाही या कोलाहलांतून शांत सुखानुभूतीचा शोध घेत फिरणाऱ्या सामान्य माणसाला या कवितरगात आढळणारा कविमनाचा ओझरता सोनस्पर्श देखील थोडाफार दिलासा देईल. म्हणून तर हा सोनस्पर्श वर्खाप्रमाण राखायला हवा; उपेक्षेन तो फुंकरला जाऊ नये असं वाटत.

**— वि. मा. दी. पटवर्धन**

# हृद्गत -

कविमंडळ नासिकचे विद्यमाने प्रकाशित होत असलेले हे द्वितीय पुष्प "कवितरंग" रसिकांच्या हाती देत असतांना आम्हांला आनंद होत आहे. "काफिला" हा कविमंडळाचा प्रातिनिधीक स्वरुपाचा काव्यसंग्रह यापूर्वी प्रकाशित झालेलाच आहे व रसिकांनी त्याचे भरपूर कौतूकहि केलेले आहे त्यामुळेच उत्तेजीत होऊन हा काव्य संग्रह प्रकाशित करण्याचे आम्ही ठरविले. योग्य संधी उपलब्ध झाल्यास या पुढेहि काव्य संग्रह प्रकाशित करण्याचा कविमंडळाचा मानस आहे.

मंडळाची स्थापना कवि केशवसुतांच्या जन्मदिनी (१५ मार्च) १९६५ या जन्मशताब्दि वर्षी नासिकचे एक क्रियाशील व सामाजिक कार्यकर्ते श्री. ग. म. अंधृटकर यांनी केली. नवोदित कविंना उत्तेजन देऊन त्यांच्यातील सुप्त काव्य शक्तीला सतत प्रेरणा देत रहाणे हे कविमंडळाचे प्रमुख उदिष्ट आहे. अनेक नवोदित कविमंडळ सदस्यांनी तशी प्रेरणाहि घेतली आहे.

"कवितरंग" हा काव्यसंग्रह विशेषत: नासिकशहर व नासिक जिल्हृयातील नवोदित कवि-कवयित्री यांचाच प्रकाशित करण्याचे आम्ही ठरविले व त्याच स्वरुपांत तो रसिकांपुढे येत आहे

कविश्रेष्ठ कुसुमाग्रज, सोपानदेव चौधरी यांचे आम्हाला सदैव मार्गदर्शन होत आहे व आशिर्वादहि मिळत आहे त्यांचे प्रेम मंडळावर प्रथम पासूनच आहे याबद्दल मंडळाला धन्यता वाटते.

श्रेष्ठ साहित्यिक व समीक्षक प्रा. वि. मा. दी. पटवर्धन यांच्या सारख्या थोरांची प्रस्तावना सदर संग्रहाला लाभलीं आहे. मंडळाला ही मोठी भाग्याची व अभिमानाची गोष्ट आहे. मंडळ त्याबद्दल त्यांचे सदैव ऋणी राहील.

सदर संग्रहासाठी आम्हाला अत्यंत उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला आहे. ज्या कवि–कवयित्रींनी आमच्या या काव्यसंग्रहासाठी कविता देऊन अत्यंत प्रतिकूल परिस्थितहि ह। काव्य संग्रह प्रकाशित करण्यास उत्तेजन दिले त्यांचे मनापासून आभार मानणे आम्ही आमचे कर्तव्य समजतो.

हा संग्रह संपादित करण्याचे दृष्टीने आमचे कवी मित्र सर्वश्री ग. म. अंधृटकर, अ. द. मैंद, अ. द. जवळकर यांनी दिलेले सहकार्य खरोखरच कौतुकास्पद आहे. त्याबद्दल त्यांचे व ज्यांनी ज्यांनी या संग्रहाला अमोल सहकार्य दिले त्यासर्वांचेच आम्ही मनापासून आभार मानतो. आमचे कवी मित्र श्री. प्रेमचंद जोहरे यांनी उत्कृष्ट मुखपृष्ठ सजावट करुन दिले त्यांचेहि आभार.

कागदाची अतिशय टंचाई व इतर अडचणी असतांनाहि उत्कृष्ट, सुबक व सुंदर छपाई करुन दिल्याबद्दल नासिक प्रविन प्रिंटिंग प्रेसचे मालक विजय त्र्यं. दाते यांचे आम्ही आभारी आहोत.

शेवटी हा "कवितरंग" रसिकांच्या हृदयांतर्गत पोचून "तरंग" निर्माण करील असा विश्वास व्यक्त करून आपली अनुज्ञा घेतो.

– माधव बाळकृष्ण जोशी
अध्यक्ष
कविमंडळ, नासिक.

अक्षय्य–तृतिया
दि. २५ एप्रिल १९७४
नासिक.

# - अनुक्रमणिका -


| कविता | | कवी |
|---|---|---|
| १) | शारदा-स्तवन | सौ. इंदिरा मेहेंदळे |
| २) | कविते देवीस | गं. ल. पवार |
| ३) | शद्ब-लावण्य | अ. द. जवळकर |
| ४) | धन्य आर्यावर्त | इंदिरा बापट |
| ५) | अष्टवक्रा यी | मधुकर वा. निकम |
| ६) | पुण्यश्लोक शिवराय | शाहीर अनंत मुळे |
| ७) | महाराष्ट्र गीत | य. मो. नरवणे |
| ८) | रविरायाचे आगमन | मनोहर मोरे |
| ९) | नववधुचे स्वागत | सौ. वसुमती साठे |
| १०) | हे बंध अंतरीचे | माधव बाळकृष्ण जोशी |
| ११) | घरकुल | सौ. मनोरमा माधव जोशी |
| १२) | चिमणा हट्ट | कु. विमल जे. घोरपडे |
| १३) | प्राण सख्यारे | भिमराव सोनवणी |
| १४) | निरोप तुझा मी घेतांना | प्र. ना. नेमाडे |
| १५) | मातृ-वियोग | बी. एस. मेधने |
| १६) | रुसवा | अनिलकुमार मेंद |
| १७) | नकोरे जीवन नासू.... | दिगंबर जोशी |
| १८) | गाण्यात माझे जिणे | सुधाकर म्हाळणकर |
| १९) | राग | प्रेमचंद जोहरे |

| कविता | कवी |
|---|---|
| २०) अर्थ | कैलास कुलकर्णी |
| २१) ही दूर दूरची वाट ... | ग. म. अंधृटकर |
| २२) कळते पण.... | यशवंत गुंजाळ |
| २३) शून्यवत् वाटचाल | ना. भा. औटी |
| २४) प्रतिक्षा | सदाशिव कळमडूकर |
| २५) कुठ पर्यंत चालणार आहे.... | बबन गणपत शिरसाट |
| २६) आम्ही जगावे कशाला ... | राम गंभीरे |
| २७) थंडी जेव्हा मी म्हणते | सौ. मंगल कन्सारा |
| २८) जीवन | (यमुनासुत) यादव खैरे |
| २९) मृत्यु | भालचंद्र काळे |
| ३०) आठवणी | विवेक गरुड |
| ३१) धूण सांधतो आहे | जयप्रकाश डोळस |
| ३२) आश्चर्य | महेश कुलकर्णी |

# शारदा - स्तवन

मंजु मधुर वीणारव सतत ऐकु दे
दे वरदे, दे वरदे देवी शारदे ।। ध्रु ।।

पद्मासन शुभ्र वसन हंस वाहिनी
कंठी माळ सुगंधित पुष्प धारिणी
परिमल हा त्रैलोक्यी सतत पसरु दे ।। १ ।।

चतुर्भुज चारुमति विश्व मोहिनी
सकल कला विद्येची तूच स्वामिनी
नाद ब्रम्ह वीणा झंकार लहरु दे ।। २ ।।

ऋद्धि–सिद्धी मूर्तिमंत तूच सरस्वती
वेदांची जननी तू माय भगवती
सत्–चित् आनंदाची तू सौख्य शांती दे ।। ३ ।।

सकल शास्त्र पुराणांसी तूच निर्मिले
कवि हृदयामाजि बसुनी तूच वर्णिले
श्रुति–स्मृतिंचा महिमा हा कानि येऊ दे ।। ४ ।।

नमन असो तव पदास भक्त वत्सले
ज्ञानदीप दावि आम्हा महन्–मंगले
सुगंधित काव्य पुष्प तुजसी वाहू दे ।। ५ ।।

— **सौ. इंदिरा मेहेंदळे**
नासिक.

# कविते देवीस...!

हे कविते देवी,
तुझी अजस्त्र पाऊले—
माझ्या हृद्‌कमलावर पडू दे....
तुझे नि:श्वास माझे श्वास होऊ दे....
माझ्या श्वास—नि:श्वासात तुझी ज्योत तेवू दे....
तुझ्या प्रत्येक रंध्रांतून चैतन्य अमृत पाझरू दे....
आणि अपूर्व मिलनाच्या शद्बांची धुंदी पेटू दे....
हे कविते देवी,
तू ज्यांच्यासाठी आहेस....
त्यांच्यासाठी मला लिहू दे....
हेच आणि एवढेच्
ह्या पामराच्या हातून पांढऱ्यावर काळे घडूं दे....

— **गं. ल. पवार**
निफाड.

# शब्द - लावण्य

साज-लाज लेवूनी सजल्या शब्द गणिकारीऽऽ
इये शब्दाचिये नगरी ।। ध्रृ ।।

लावण्याची लेवूनी नुपूरे । नर्तन करिती शब्द सुंदरी
निळ्या-निळ्या वलयात प्रकटली भाव सुंदरी रीऽऽ ।।१।।

इष्काचे ही भरती प्याले । लावणीच्या या रंगमहाली
उधळण-पखरण पखरण-उधळण करी शब्द नर्तकीऽऽ ।।२।।

गज्जल गीते आणि शायरी । इष्काच्या या सुंदर परी
प्रियतम-प्रियकर प्रियकर-प्रियतम भेटती शब्दांच्या उरीऽऽ ।।३।।

रसवंतीचे झरे वाहती । भक्ति रसाच्या मळ्यातूनी
विठ्ठल-रखुमाई रखुमाई-विठ्ठल बोले शब्दांतरीऽऽ ।।४।।

भावफुलांच्या सुंदर माळा । भावगीतातुनी गुंफूनी आल्या
बकुल-चंपका चंपक-बकुला दरवळे शब्द फुलांपरीऽऽ ।।५।।

काव्य स्फुर्तिच्या प्रेरणेला । रसिक जनासी आदरोनी
गजमूर्तिला वंदन करुनी वाहतो शब्दांची जुडीऽऽ ।।६।।

— **अ. द. जवळकर**
नासिक.

# धन्य आर्यावर्त

धन्य आर्यावर्त जेथे देवाचे अवतार
ऐशा माय भूमी माझा प्रणाम वारंवार ।

धन्य हिंदू धर्म द्वेष न करी कोणाचा
सर्व सुखे नांदो अशी इच्छा आणि वाचा ।

धन्य कुरुक्षेत्र जेथे जन्मे भगवत् गीता
जगी वंद्य ऐशा ग्रंथा भारत निर्माता ।

धन्य भूमी नित्य संत येताती जन्माला
कर्म भूमीत नाही अुणे अध्यात्म ज्ञानाला ।

धन्य देश ऐसा जेथे पतिव्रता नारी
धन्य राष्ट्र नित्य जेथे जन्मती पुढारी ।

धन्य हिन्दुस्तान माझा शांतीचे माहेर
लाज त्याची राखी देवा तुझ्यावरी भार ।

— **इंदिरा बापट**
नासिक.

# अष्टावक्रा मी –

शिल्प प्रासादाचे, मला नसे काही ।
विजनवासी कुटि मी, उन वारा साही ॥
तव दर्शनास्तव रे, प्राण कंठी धरिला ।
धावुनि रामा वेगे, पाव शबरीला ॥ १ ॥

कांचन मृग मी, नाहीच मायावी ।
शुर्पनखी कांगावा, न माझ्याठायी ॥
शापितसे मी शिळा, गौतमाचि नार ।
धाव रघुविरा करण्या अहिल्या उद्धार ॥ २ ॥

नारदाच्या कळिला, नको साद घालू ।
सुभद्रेचा भर्जरि, मी नसे शालू ॥
कसे कृष्णा ! कापले बोट असे रे ।
मी द्रौपदिचि चिंधी तुझ्या जखमेवरी रे ॥ ३ ॥

गोकूळ वियोगी इकडे, तू मथुरेला ।
उद्धवास पहाता, आनंदा पूर आला ॥
लोटले गोकूळ सारे, क्षेम पुसण्यास ।
मी कुब्जा तुझी कान्हा, चोरते अश्रूस ॥ ४ ॥

पडोत चरणी तुझिया, अश्रु तिर्थ व्हावे ।
अष्टवक्रा मी जरी, पुजिते स्वभावे ॥
नको पाय चोरु कान्हा, तुडवू नको रे ।
मीरा मुखी अमृत, तू विष प्याला रे ॥ ५ ॥

— **मधुकर वा. निकम**
दाभाडी.

# पुण्यश्लोक शिवराय

(पोवाडा)

पुण्यश्लोक शिवाजी राजे, श्रेष्ठ अद्वितीय भूवरती ।
असा मोहरा होणे नाही, पुनरपि, धन्य वीर जगती ॥ ध्रृ ॥

आकाशामधि विपुल तारका नक्षत्रे दिसती स्पष्ट । बहु नक्षत्रे एक चंद्रमा-श्रीशिव धवलयशी खचित ॥ राहु, केतु, विजापूर-दिल्लीपती शिवासी ग्रासाया जातीं । ग्रहण परी ते, अस्त कसा हो ? रवि पुढती खद्योत किती ॥ स्वाभिमानि तो शिर लववीना परकीया भूपा पुढती । गाय छाटिता कसाब वधिला, गोद्विज पालक ही कीर्ती ॥ महा प्रचंड आल सैन्य, तळपला त्या मधि अफजुलखान, ठका महाठक शिवाजी पूर्ण, खान निमाला । अनेक दिव्यांतूनी वाचले महाराज शिव अवतारी । शाहिस्त्याची मेधा झाली दिल्लीपती होई वैरी ॥ दिल्ली पती शिव सिंहा ठेवी कोंडुन, जाळे सर्व बाजुन, नित्य करी अपमान, चकवील दिल्लीपतीला । वाटी मिठाई खान अमीरांला, त्याच पेटाऱ्यांतुनी निसटला ॥ यश नाही सामान्य हे देश वाचला, शहा वेडा जाहला, शिव सैतान बडा, धडकी भरली अलीशहाला । उदयभान ठार जाहला, सिंहगड राज्या जोडीला ॥ गो ब्राम्हण प्रती पालक धन्य शिवराय, हिंदुधर्मासी सहाय्य, राज्याभिषेक रायगडी केला । हिंदूचा राजा ठरला, नवही खंडी जयजयकार झाला ॥

जे नाही कोणी केले । शिवरायें ते साधिले ॥ अन्यासी शक्य ना झाले । ते सुयश सहज मिळविले ॥ चातुर्य शौर्य द्वय आले । चारित्र्य वंदनीय ठरले ॥ परदास्याच्या जड शृंखला शिवाविना कवणा तुटल्या । यवन, म्लेंच्छ सत्तेवरी विजयी वीर भारती नच झाला ॥

— **शाहीर अनंत मुळे**

नाशिक.

# महाराष्ट्र गीत

दोन्ही करांनी घेऊनी हाती, महाराष्ट्राची माती
लावुनी भाळी पुनीत जाहले, पुनीत जाहलो या जगती ॥१॥

नाही इथे हो गोमती-गंगा, नाही इथे हो शरयु-यमुना
तुकोबाच्या भक्ती रसाची, वाहते येथे रसवंती ॥२॥

कशास हवी हो काशी-आयोध्या, कशास हवी हो गोकुळ-मथुरा
श्रीराम प्रभुंच्या चरण रजानी, पुनीत जिथे पंचवटी ॥३॥

उंच हिमालय येथे नाही, उंच जलाशय येथे नाही
उंच राहती माना येथे, शत्रु भयाने लटपटती ॥४॥

शूर शिवाजी इथे जन्मले, मर्द मराठे इथे वाढले
श्रेष्ठ संत इथे बोलले, जगती गाती ज्यांची कीर्ती ॥५॥

— **य. मो. नरवणे**
नासिक.

# रविरायाचे आगमन

पूर्व दिशेला रविरायाचे झाले आगमन
स्वागतास्तव करती बाला सडा-संमार्जन ॥ ध्रु ॥

विहंगमेळा गीत गातो तरु शिखरावरती
पल्लवांच्या संगीतावर नाचती वृक्षतती
गवताचींही तरूणपाती विनये वंदन करती
गुलाब कलीका सुगंध उधळी मंदवायुवरती
सुवर्ण किरणे हसवुन जाती कमल दलांना खुलवून ॥ १ ॥

डोंगर माथे सुसज्ज सारे येई भानु म्हणुनी
सरीता सागर करीती संचलन जयघोषा करुनी
गुलाल उधळीत आला सखया दिगंतरातुनी
दृष्य मनोहर बघुन जन हे, उभे कर जोडूनी
प्रकाशुनिया देई भास्करा जगता नवजीवन ॥ २ ॥

गुरे निघाली धन्या संगती हिरव्या-हिरव्या कुरणी
शेतावरही निघे शेतकरी सवे बैल घेवुनी
खुलता दारे शारदेची बालके येती धावुनी
विद्याधन संपदा मिळविण्या येती ही हर्षुनी
किमया सारी तुझी प्रभाकर सहस्त्र तुला नमन ॥ ३ ॥

— **मनोहर मोरे**
नासिक.

# नववधुचे स्वागत

लक्ष्मीच्या पाऊलाने येई तू घराला
सुवासिनी दारी उभ्या तुझ्या स्वागताला ।

तोरणे नी पताकांनी सजविले घरदार
डुलतात केळी दारी गणेशाचे चित्र वर ।

आजचा हा शुभदिन आला सखे जीवनात
आनंदाने करी आता संसाराला सुरवात ।

रेंगाळते मन तुझे माहेरच्या ग घरात
उचल तू पाऊलास परी शंका नको मनात ।

सनईच्या सुरामधे ओलांडी हलके माप
माता मनी काढी दृष्ट पाहूनि जोडी अनुरुप ।

करामध्यें वसो लक्ष्मी सरस्वतीची जणु वाणी
प्रसन्नता लाभु दे तुज देवापाशी हीच मागणी ।

— **सौ. वसुमती साठे**
नासिक.

# हे बंध अंतरीचे....

हे बंध अंतरीचे तुटता कधी तुटेना
धाग्यात एक धागा जुळला कधी कळेना ॥ १ ॥

जव देखिले तुला गे हुरहूर लागी जीवा
माझाच मी न राही कळले मलाची तेव्हां ॥ २ ॥

स्वर्गीय प्रिती फुलली मन मंदिरीच स्फुरली
सहवास तव घडावा ही एक आस उरली ॥ ३ ॥

हा दैवयोग जुळला आपुला विवाह झाला
मम पत्नी गे म्हणूनी सदनी प्रवेश केला ॥ ४ ॥

संसार रुपी रथ हा हाकू मिळुनी दोघे
लाभो सदैव वाटे आधार मज तुझा गे ॥ ५ ॥

ऋतुराज वसंत आला पानी मोहोर फुलला
चाहूल नव जिवाची लागे, आनंद झाला ॥ ६ ॥

काहीं उणे न मजला या जीवनी आतां गे
लाभो सदाच साथ मम ध्येय पूर्तिला गे ॥ ७ ॥

— **माधव बाळकृष्ण जोशी**
नासिक.

# घरकुल

आहे मनांत माझ्या । घरकुल छान एक
आम्ही असूनि दोघे । अन् तान्हुलेहि एक ॥ १ ॥

आधि दर्शनी असेल छोटी गणेश मूर्ति
त्या मूर्तिच्या प्रभेने उजळूनि जाती भिंती ॥ २ ।

असूनि विहीर छोटी परसांत पारिजात
ती कृष्ण तुळस शोभे वाटे कसे प्रशांत ॥ ३ ॥

नाही दिवाणखाना । साधी प्रसन्न खोली
जय राम कृष्ण हरी । नादे भरूनि गेली ॥ ४ ॥

माता पिता नि बंधू । भगिनी नि आप्त येती
सासु श्वशूर आदि । गेहास भूषविति ॥ ५ ॥

हा बाळराज खेळे । मांडूनि खेळ दारी
त्याचे विमान घेई । त्या अंगणी भरारी ॥ ६ ॥

टाळ्या पिटीत धावे । छोटा विमान तज्ज्ञ
आई पहा–पहा ना । माझे उडे विमान ॥ ७ ॥

मम नेत्री स्वप्न तरळे । येई भविष्य काळ
हो तज्ञ राष्ट्रहिता । दिर्घायु होओ बाळ ॥ ८ ॥

**— सौ. मनोरमा माधव जोशी**
नासिक.

# चिमणा हट्ट

रंगी–बेरंगी पाळणा । बाळ निजे त्यात
टकमक पाही बाई । झोप न ये इतुक्यात ॥१॥

इवलाले डोळे काळे । छताकडे लागलेले
मुठी घट्ट बंद करी । जणु काही झाकलेले ॥२॥

किती हलवावा बाई । कुरकुरे तो पाळणा
झोपेचा ग पत्ता नाही ! मस्त खेळे बाळराणा ॥३॥

हात पाय हलवुनी । उगीच का ओरडावे
छताकडे पाहुनिया । उगा का भांडावे ॥४॥

त्यांनी जर का पाहिले । नेमके ते म्हणतील
आई सम भांडखोर । बाळा तुही निघशील ॥५॥

आता येतिल ते बाबा । स्वैपाक तयार नाही
बाई बाई काय करु । बोलतील काही बाही ॥६॥

निज माझ्या सानुल्या । निज आता माझे आई
समजले रे लबाडा । हवी तुज अंगाई ॥७॥

— कु. विमल जे. घोरपडे
मनमाड.

# प्राण सख्यारे

रात्र रात्र जागविल्या आठवणी तुझ्या रे
कां धरशी मजवरी कोपा प्राण सख्या रे ।।धृ।।

थकले डोळे वाट पाहता
ध्यास मनी तव उठता बसता
सुन्या घरा मी एकटी फिरता
एकाकी पण जाळी चिंता
कां सोडिशी साथ कळेना नाथ रे ।। १ ।।

अश्रू दाटले, शद्ब खुंटले
तुज आळविता सूर संपले
कंठ माझा सुकला आता
प्राण नाथा तुज आळविता
देई दिलासा मज शिणल्या वेडीस रे ।। २ ।।

मज स्थान दे तव मनात
लावीन हृदयी मी फुलवात
प्रितीचा तो कळस व्हावा
नि:शद्बातून शद्ब उठावा
प्रेम ज्योतीचे तेज पसरुदे साऱ्या विश्वात रे ।। ३ ।।

— भिमराव सोनवणी
चिंचोली

# निरोप तुझा मी घेतांना....

हंसतो लटके येतांना
निरोप तुझा मी घेतांना....॥ ध्रृ ॥

तुजविण जगू मी कैसा
जळाविण जैसा मासा
तडफडतो मी येतांना...॥ १ ॥

राम वनासी जाता
होती जवळी सीता
मी तर एकटाच येतांना....॥ २ ॥

तुजविणच्या त्या रात्री
जाळतील मज गात्रोगात्री
कष्ट दोघांच्या हृदयांना....॥ ३ ॥

आतां कसलें मधु–मीलन ?
मिळणार न ते साधें जेवण
आक्रंदतें अंतर येतांना....॥ ४ ॥

वाटे घ्यावें गोड चुंबन
द्यावे दृढ आलिंगन
परि सभ्यता अडे दोघांना....॥ ५ ॥

— **प्र. ना. नेमाडे**
नासिक.

२८०५
२२७०८

# मातृ-वियोग

निरोप मृत मातेचा, समजतां क्षणी तो रडे
निघे पळत भेटण्या, स्वमातेस गांवाकडे ।

सतेज नयनातूनी, टपटपा गळे आसवे
थरारत भुजा, पदी लटपटे, थके तो सवे ।

रित्या नदीतुनी पळे रडत, घोर रानी वनी
जराक्षणी हसे कुरुप रजनी, जशी यक्षिणी ।

तया दिसतसे क्षणैक चमके, हि बत्ती परी
स्मशान भुमिचा प्रकाश बघुनी, न दुःखावरी ।

तया क्षणीच कोसळे, भुवरी शोभते पाखरू
मनी जननिचा विचार करिता, उठे लेकरू ।

सुटे शर धनुतूनी, अन बसेल शत्रूवरी
तयासम जणू स्मशानी, वीर ठेपला यापरी ।

पहात मृत मातृसी धाव-पडे, मृतात्म्यावरी
भुकाच शिशु प्राशितो, दुध जणू हि मातेवरी ।

सुजान मुलगा अजान म्हणुनी, तया सोडवी
धडाडत चिता, सजान मन बालका चेतवी ।

— बी. एस. मेधने
खडक ओझर.

# रुसवा

रुप गुणांवर भाळून केली त्याच्याशी मी प्रित
विषयी देहा भोगूनी त्याजिली हीच असे का रीत ! ।

भोगी-अभोगी टपूनी बसती सदा सर्व काळ
संधी येता तुटूनी पडती होती कर्दन काळ ।

कळचा-फूले ती प्यारी म्हणूनी आम्ही खोवीतो माथी
पुरुष भृंगे स्वाद घेउनी फेकिती त्यास पथी ।

अनेक विध ते मार्ग तयांना करण्या जवळीक
काय तरी हा निसर्ग बाई करूनी जातो आगळीक ।

— **अनिलकुमार मैंद**
नासिक.

# नको रे जीवन नासू....

नको रे जीवन, नासू असे
खेळ प्रितीचा, झाला क्षणभर
झाले जगती हंसे....॥ ध्रृ ॥

तुझ्याचसाठी, मनात झुरले
झुरता-झुरता स्वप्नही विरले
विरलेल्या त्या, सुख स्वप्नांची
खंत तुला रे नसे....॥ १ ॥

प्रणय धुंद त्या, मादक रात्री
मदन पेटला, गात्रो गात्री
भान हरपता, कौमार्याचे
मनी विधाता हंसे....॥ २ ॥

तुझ्या प्रितीची, साक्ष ही गहिरी
वाढविते मी, माझ्या उदरी
पवित्र प्रिती, शापच ठरली
आज मनावर ठसे....॥ ३ ॥

— **दिगंबर जोशी**
नासिक.

# गाण्यात माझे जिणे

निसर्ग लावण्याची ओठात मदिरा पिणे
रानात गाव माझे, गाण्यात माझे जिणे ॥ ध्रृ ॥

शब्दात ठेवूनी मन, स्तब्धात ठेवूनी तन
असे एकटे जीवन, कवितेत माझे वतन
मस्त कलंदर होउनी वाऱ्यासहित जाणे ॥ १ ॥

सूरात सूर मी व्हावे, स्वर्गात इंद्र मी व्हावे
सुर्यात चुंबन घेउनी, चंद्रात मी जळावे
स्वप्नातल्या परीचा सदैव शोध घेणे ॥ २ ॥

पूर्वेत फाकली प्रभा, मी असा राहीलो उभा
चंद्र, चांदण्यांची, मीच भरविली सभा
वाहत्या नदीच्या काठी मीच लव्हाळी होणे ॥ ३ ॥

— सुधाकर म्हाळणकर
इगतपुरी.

# राग....

सागर सरिता एक होता लाट हिंदळते
तुझे नी माझे असेच आहे जीवनरूपी नाते ।

दोन जीवाची ओढ धावते जशी परस्परी
वृंदावन ते जसे उजळते निरपेक्षेच्या अंतरी ।

मीलन अतूट राधा-किसनचे जसे कधी ना घडते
पावन निर्मल सहवासाने जशी भावना फुलते ।

धुंद स्वरांची नको चांदणी हवे तुझेच दुःख
अन्य सुखाची ना खंत, उराशी हवे तुझेच सौख्य ।

धरणी पाठी गगनाचा कर सांत्वनी फिरतो
जीवनाचा तूच राग मज जो सूर साथी होतो ।

— **प्रेमचंद जोहरे**
नासिक.

# अर्थ

हळूच कळीचें फूल उमलावे ...
चंद्राने ते मिठीत घ्यावे....
घेशील कधी मज हृदयाशी....
म्हणशील केंव्हा तुझीच रे मी....
नेत्रांनी माझ्या सौंदर्य तुझे चुंबिले....
आठवता स्मृति गीत अर्धे राहीले....
देहभान विसरुन मी चंद्रमुख पाहीले....
हळूच ओठ थरथरले, पापणी ती लवली....
गुलाब गाली बहरले, सुंदर तू लाजली....
लाजून तु होऊ नकोस ग अबोल....
भिती कुणाची बाळगून दूर तू होऊ नकोस....
माझ्या गालावर तुझ्या ओठरुपी पाकळ्या....
कदाचित लाजतिल आपुल्या त्या सावल्या....
स्मृतीच्या गुच्छाला सुगंध फुलांनी तो द्यावा....
पवित्र प्रेमाला आपुल्या 'अर्घ्ये' तो का द्यावा....

— **कैलास कुलकर्णी**
नासिक.

# ही दूर दूरची वाट....

ही दूर दूरची वाट
दृष्टीच्या टप्प्यांत, येईल तितकी
साठवीत बसतो ....
आणि चिंतन करतो
चाललेल्या अर्ध्या वाटेचे ?
अनुभवलेल्या सुखदुःखाचे
साहिलेल्या मानापमानाचे !
कर्तंकाच्या पराभवाचे !
राहिलेल्या जीवनाची
अशीच का असेल वाट ?
ही बिकट वाट ....
उन्हाने रखरखलेली
अंतर्यामी व्याकुळलेली
भवितव्याच्या अंधारात ....
सदा लपलेली
चकाकते पण दिसत नाही ...
ही दूरदूरची वाट
ही दूरदूरची वाट !!!

— ग. म. अंधूटकर
नासिक.

# कळते पण ....

असा रहातो उभा
अन, आठवतांना ....
काही विसरत जातो
क्षण गिरक्या घेतात
गात्रांतून पळस फुलत रहातो
वाटा फुटतात नि मिटतात ....
काळोख पुन्हा दाटतो
दरवळतात ती स्मृतिपुष्पे
त्या गंधात ....
कसा मी स्वतःस हरवून बसतो
किती ओढून घेतो पडदे
तरीही अंतर होते उघडे
मला कळते
पाया खालची वाळू सरकते
तरी ही सोन्याचे कळस उगाच लावतो ....

— **यशवंत गुंजाळ**
मालेगांव

# शून्यवत् वाटचाल ....!

माझे सुंदर स्वप्न संपून गेले ....
आशेचे भव्य मनोरे माती मोल झाले !
सूर्य, चंद्र अन् अवघे तारे ....
वाटू लागले फिके सारे !
शोभिवंत फुले, गुणवंत मुले, उमदे चेहरे ....
सारे-सारे दिसू लागले नीरस नि गहिरे !
डोक्यात नाना विचारांचे वाहते वारे ....
मनोमनी टाकणे खिन्न सुस्कारे !
असे का बरे व्हावे ? काय माझा गुन्हा ? ....
आता या प्रश्नांना कोण देणार उत्तरे ?
सामोपचार, समझोता, संपले सारे
माहित असूनहि फुलवितो मनाचे निखारे !!!
दिवसा मागुन येतात ठरलेल्या रात्री
शून्यवत् चालते जगाची वाटचाल ती ....

— ना. भा. औटी
नासिक.

# प्रतिक्षा

जगाच्या पाठीवर
आयुष्याच्या वाटेवर
जीवनाच्या रूक्ष
विशाल रानात
भर दुपारी ....
उभा आहे एक जीवन वृक्ष
निष्पर्ण....
भग्न हृदय सतारीच्या
शुष्क फांद्यांच्या
तारा छेडीत ....
वेदनांचे गीत गात
भर दुपारी ....
भविष्याच्या क्षितीजाकडून
वसंताच्या वाऱ्याची !!!
प्रतिक्षा करीत ....

— सदाशिव कळमडूकर
मनमाड.

# कुठपर्यंत चालणार आहे .... !

कुठपर्यंत हे चालणार आहे ?
घासातला घास घेणं
ढेकर आला तरी;
घांस संपलेल्यांच, मांस शिजवणं
हाडं दिसली तरी ॥ १ ॥
कुठपर्यंत हे चालणार आहे ?
घासासाठी उघड प्रदर्शन
देहाच, देहाला
घासासाठी दारोदार हिंडण
जिवंतपणीच्या मढ्याला ॥ २ ॥
कुठपर्यंत हे चालणार आहे ?
घासासाठी फाजील दडपण
शद्वांच, शद्वांवर
घासासाठी इज्जतीची उधळण
राजरोज रस्त्यावर ॥ ३ ॥
कुठपर्यंत हे चालणार आहे ?
घासासाठी संघर्ष करण
मानवाशी, मानवान
घासासाठी वंश वाढवण
मानवाचा, मानवान ॥ ४ ॥
कुठपर्यंत हे चालणार आहे ? ? ?

— **बबन गणपत शिरसाट**
सिन्नर.

# आम्ही जगावे कशाला.... !

महागाई भस्मासूर मातला
उघड्यावर जनता आजला
नशिबाने हो छळवाद मांडला
आता देवा, आम्ही जगावे कशाला ? .... ॥ १ ॥

होते नव्हते ते हातोहात गेले
अस्थिपंजर पुतळे इथे राहिले
दारोदार मुडदे, नेत्र थकले
पहा देवा, हे जिणे हो कसले ? .... ॥ २ ॥

मरेना तव जगतो आजला
खपाट पोटे, निसर्ग रे हांसला
थाटला संसार, फाडुनि टाकिला
सांगा देवा, आम्हां जिवंत ठेविता कशाला ?....॥ ३ ॥

— राम गंभीरे
नासिक.

# थंडी जेव्हा मी म्हणते

थंडी जेव्हा मी म्हणत असते,
अंगात धडशी बंडी नसते.
गांवात कुठे घर नसते
फूटपाथवर भीस्त असते.... !!!
तशात आणिक रात्र येते !
पायांची जुडी रित्या पोटाशी,
कवटाळून पडणेच आता भाग असते
बारदानाला वरदान समजुन .... !!
रक्त मात्र गोठत जाते
देवालाच अखेर दया येते ....
दिशा दीपवीत उषा उजळते
दाट धुक्याच्या चादरी खाली,
जीवन आता उरले नसते .... !!!

— सौ. मंगल कन्सारा
नासिक.

# जीवन

पांखरा सारखं जगावं माणसानं !
पांखर, जगतात स्वैर आकाशासाठी
बेफाम झेपेसाठी !
घरट्यासाठी नव्हे ! !
एक घरटं मोडल तर ती दुसर बांधतात
माणसानही एक स्वप्न भंगल, तर रचाव दुसर
जगाव, जगण्यासाठी ....
जीवनासाठी ....
.... केवळ स्वप्नासाठी नव्हे !

( यमुनासुत )
**यादव खैरे**
नासिक.

# मृत्यु

आयुष्याची गोळा बेरीज करतांना,
मांडले होते एक गणीत....
आयुष्य होते खर्च,
तर, मृत्यु होता जमा
जीवन भर सतत केली,
माणुसकीची गुंतवणूक
अखेरीस मात्र मृत्युने केली,
आमचीच फसवणूक
सहवास होतो इतिहास जमा
अन् आठवणींचा असतो जाहीरनामा....
शुभकार्ये नि समारंभ !!
ही होती फायद्याची यादी
दुखणे–गरीबी–काबाड कष्ट,
यांनी लिहील्या नुकसानीच्या नोंदी....
जन्माची सारी कमाई होती,
फक्त सदाचार, सद्वर्तन....
संयम आणि जिद्द
यांचे ठेवले अगत्य
अखेरीस मृत्यू हेच उरले सत्य....!!!

— **भालचंद्र काळे**
नाशिक.

# आठवणी

सायंकाळच्या आभाळावरुन
तरंगत जाणारी....
ती सोनेरी स्वप्ने !
रात्रीच्या काळचा अंधारात
संपणारी !
पांढऱ्या शुभ्र पहाटेवरुन
घरंगळणारी
दंवबिंदुंची ती स्वप्ने !
लखलखणाऱ्या
सुर्यकिरणात संपणारी !
चिमुकल्या पायांची
आजीच्या साम्राज्यात
हरवलेली ती स्वप्ने !
मृत्युच्या लाल पंजात....
संपून जाणारी !
अशी ही स्वप्ने
तुकडे होऊन उधळलेली....
हळव्या हृदयात जमली की
त्याच्या होतात आठवणी !!!

— **विवेक गरुड**
नासिक.

# धूण सांधतो आहे

सप्त सूरांनी गीत आळवीत
हुंदक्यांच्या स्वरात....
कडवट आठवणींचे
क्षण जुळवीतो,
दुखावलेल्या उरात....
उगाच कधीचा सतार छेडीत
धूण सांधतो आहे....!
गर्द धुक्यातच,
तरंगते मनोरे बांधतो आहे....!
पुसटशा आठवणींची माळ,
अजून ओवतो आहे
विषारी अनुभवांचे जहरी बोल....
जन्मापासून ऐकतो आहे
आता अखेरची धूण सांधण्यासाठी....!!!
काळ उभा आहे दारात
'आ' वासून....

— जयप्रकाश डोळस
इगतपुरी

# आश्चर्य

कुबडी घेऊन चाललेल आयुष्य,
सहाणे शेजारी स्तब्ध,
दिवस काढणाऱ्या खोडाप्रमाणे,
दिवस काढतो आहे....
प्रलयाच्या तूफानी पणती भोंवती,
पदर धरुन ज्योतिची फडफड थांबवण्याचा !!!
निरर्थक प्रयत्न करतो आहे...
कवटीच्या दाताप्रमाणे, विचकणाऱ्या,
दैवाच क्रूर हास्य, भरलेल्या डोळ्यांनी, !
विस्फारुन पहातो आहे,
गळ्यात ऋणांचे जाते अडकावून,
कधीच खोल डोहीगाळात रुतलो आहे....
पूर्ण अडकलो आहे,
निर्जीव कातडीतून रक्ताचे थेंब,
कधीच आटले आहेत,
तरी आश्चर्य हे की
अजून मी जिवंत आहे...
मृत्यू शिवाय अस्तित्व हरवून बसलो आहे....!!!

— **महेश कुलकर्णी**
नासिक.

REFBK-0022708